# उल्हासनगर महानगरपालिका
## माहिती व जनसंपर्क विभाग

दुरध्वनी क्र. ०२५१-२७२०११६, विस्तार क्र.२२५ proumc321@gmail.com


दिनांक : ३०/०३/२०२४

# प्रेसनोट

उल्हासनगर महानगरपालिका वैद्यकिय आरोग्य विभाग अंतर्गत उत्कृष्ट काम करणाऱ्या आशा स्वयंसेविका यांचा सत्कार कार्यक्रमाचे आयोजन उल्हासनगर महानगरपालिका महासभा सभागृह येथे दिनांक ३० मार्च २०२४ रोजी पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा. प्रशासक तथा आयुक्त - श्री. अजीज शेख तर प्रमुख अतिथी म्हणून मा. उप- आयुक्त (वै.आ.वि.) - डॉ. सुभाष जाधव, मा. वैद्यकिय आरोग्य अधिकारी- डॉ. मोहिनी धर्मा उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरूवात दिपप्रज्वलनाने केली. तसेच यावेळी मान्यवरांचे स्वागत करून कार्यक्रम सुरू करण्यात आला. कार्यक्रमास शहर कार्यक्रम व्यवस्थापक- डॉ. विद्या चव्हाण, शहर लेखा व्यवस्थापक श्री. दिनेश तानाजी सरोदे, आशा गटप्रवर्तक श्रीम. प्रतिमा रामटेके, सार्वजनिक आरोग्य परिचारक जॉन्सन राव, सर्व नागरी प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकिय अधिकारी व आशा स्वयंसेविका उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन अधिपरिचारिका श्रीम. पोर्णिमा खरात व श्रीम. पुनम देशमुख यांनी केले.

उल्हासनगर महानगरपालिका कार्यक्षेत्रात उत्कृष्ट काम करणाऱ्या प्रथम पारितोषिक आशा स्वयंसेविका श्रीम. छाया गवळी यांना रोख रक्कम २५०००/- रू. व सन्मानचिन्ह, द्वितीय परितोषिक आशा स्वयंसेविका श्रीम. शिल्पा मोहोड, यांना रोख रक्कम १५०००/- रू व सन्मानचिन्ह व तृतीय पारितोषिक आशा स्वयंसेविका श्रीम. आरती अहिरे, व श्रीम. नुतन भालेराव यांना रोख रक्कम ५०००/- रू व सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. तसेच या ना.प्रा. आ. केंद्रातंर्गत निंबध व रांगोळी स्पर्धाचे आयोजन करण्यात आले व या स्पर्धेदरम्यान प्रथम व द्वितीय पारितोषिक देण्यात आले. त्याच बरोबर कायाकल्प अंतर्गत उत्कृष्ट आरोग्य केंद्र म्हणुन नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र १ यांना सन्मान चिन्ह देऊन गौरविण्यात आले.

आशा स्वयंसेविका ही शहरपातळी वरची महत्वाची दुवा असुन आरोग्य विषयक सर्व बाबींची माहिती तिने जवळ ठेवून गुणात्मक आरोग्य सेवा देणे महत्वाचे असल्याचे महानगरपालिकेचे वैद्यकिय आरोग्य विभागाचे मा. उप-आयुक्त यांनी याप्रसंगी म्हटले. शहरातील आशा स्वयंसेविका यांनी कोरोना काळात शहरातील विविध भागात उत्कृष्ट कामकाज केल्याने सर्व आशांचे कौतुक व अभिनंदनास पात्र असल्याचे मा.वैद्यकिय आरोग्य अधिकारी यांनी या कार्यक्रम प्रसंगी म्हटले. सर्व पुरस्कार प्राप्त आशा स्वयंसेविका यांचे आरोग्य क्षेत्रात अभिनंदन करण्यात आले. व मान्यवरांचे आभार मानून कार्यक्रमांची सांगता करण्यात आली.

३०/३/२४

(छाया प्रकाश डांगळे)
जनसंपर्क अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

प्रत – माहितीस्तव.
मा. प्रशासक तथा आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका
प्रत – योग्य त्या कार्यवाहिस्तव रवाना.

३) पत्रकार कक्ष, उल्हासनगर महानगरपालिका
४) सिस्टीम ॲनलिस्ट, माहिती तंत्रज्ञान विभाग, उल्हासनगर महानगरपालिका
- सदरची प्रेस नोट उल्हासनगर महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी.